सोलापूर तरुण भारत
सोलापूर | मंगळवार, दि.३१ मार्च २०२६



# श्री विष्णू महादेव यात्रा विशेष

तामलवाडी, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

* पुरवणी संयोजक *
अविनाश गणपतराव गायकवाड




श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या तमाम भाविकांचे यात्रा कमिटीच्या हार्दिक स्वागत!



श्री.सुनील पाटील – अध्यक्ष - यात्रा कमिटी
श्री.विनायक पाटील – उपाध्यक्ष - यात्रा कमिटी
श्री.कृष्णा घोटकर – सचिव - यात्रा कमिटी
श्री.ज्ञानेश्वर जगताप – सहसचिव - यात्रा कमिटी
श्री.शाहीर गायकवाड – सदस्य - यात्रा कमिटी

शुभेच्छुक
यात्रा कमिटी सर्व सदस्य व ग्रामस्थ, तामलवाडी

श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या तमाम भाविकांचे हार्दिक स्वागत...



रवी इलेक्ट्रिकल ॲन्ड हार्डवेअर
तामलवाडी, ता.तुळजापूर
प्रो.प्रा.विश्वनाथ कानडे

श्री विष्णू-महादेव यात्रेस येणाऱ्या तमाम भाविकांचे हार्दिक स्वागत





मा. संतोष (दादा) बोबडे
भाजपा नेते / पंचायत समिती सदस्य, तुळजापूर
शुभेच्छुक
सनराईज इंग्लिश मिडियम स्कूल, तामलवाडी, ता.तुळजापूर

श्री विष्णू महादेव नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या सर्व भाविकांना मन:पूर्वक
शुभेच्छा





* शुभेच्छुक *
मोरया स्टोन क्रशर
तामलवाडी, ता.तुळजापूर
प्रो.प्रा.अविनाश शिंदे, मो. 9881155845



श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या तमाम भाविकांना आमच्याही कोटी-कोटी शुभेच्छा..!



* शुभेच्छुक *
त्रिंबक दिक्षीत
द्वारका अलंकार
सोन्या-चांदीचे दागिने योग्य दरात व ऑर्डरप्रमाणे तयार करून मिळतील.
मो.9960540545
मेन रोड, पाण्याच्या टाकीजवळ, तामलवाडी

श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या तमाम भाविकांचे हार्दिक स्वागत!



शिवभक्त – मा.श्री. रामदास गायकवाड
शिवभक्त – प्रथमेश संभाजी माळी
बालभक्त – कु. कोमल राऊत
बालभक्त – चि. शिवम राऊत

कोमल कलेक्शन
प्रो.प्रा.विठ्ठल बब्रुवान राऊत
तामलवाडी, ता.तुळजापूर

पुनम व्हेजीटेबल ॲन्ड फ्रुट सेंटर
प्रो.प्रा.संभाजी बलभिम माळी | तामलवाडी, ता.तुळजापूर

KSR
SYMBOL OF TRUST



किसान इरिगेशन्स आणि इन्फ्रास्ट्रक्चर लि.मुंबई
आमचे असंख्य ग्राहक, विक्रेते, वितरक, कंत्राटदार, कर्मचारी आणि हितचिंतक यांना श्री विष्णू महादेव यात्रा सोहळ्यानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!



श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या तमाम भाविकांना आमच्याही कोटी-कोटी शुभेच्छा



PPP KISAN PARIWAR
PP Patel & Co.
METAL POWDER DIVISION
Regd.Office : 477, Sakhar Peth, Solapur - 413 005
Ph.: 91-217-624954/ 627663 Fax - 91-217-624949
Plant : Gat No. 363, Tamalwadi, Dist. Osmanabad.
Email . ppatel@vsnl.com




श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या तमाम भाविकांना मनस्वी शुभेच्छा!

अप्रतिम, परिपुर्ण सुविधांनी थाटलेल, हिरवाईनं नटलेलं, प्रत्येक शुभ कार्याला आपलेपणाचा स्पर्श देणारे व हजारोंना सामावुन घेणारं सर्व सुविधायुक्त प्रशस्त मंगल कार्यालय आता आपल्या सेवेत...!

## जिजाई माऊली मंगल कार्यालय

आनंद वाटल्याने.. वाढतो

✲ भव्य मॅरेज हॉल ✲ प्रशस्त रुम ✲ प्रशस्त पार्किंग व्यवस्था
✲ चविष्ट जेवण ✲ फिल्टर पाणी ✲ भव्य किचन हॉल
✲ डायनिंग हॉल ✲ केटरींग व्यवस्था ✲ खुर्ची, टेबल
✲ वाजवी दर ✲ मागणीनुसार इतर सोयी मिळतील.

सामाजिक बांधिलकीसह व्यवसाय

प्रो.प्रा.भारत ज्ञानोबा राऊत

संपर्क : मो.९१५८९९९०९१ / ९४२०४११६६७



श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या तमाम भाविकांना आमच्याही आभाळभर शुभेच्छा!



युवा भाजप नेते/सदस्य — मा.श्री.यशवंतआण्णा लोंढे
सरपंच — मा.सौ. नुरबानो सि.बेगडे
ग्रामसेवक — मा.श्री. चैतन्य गोरे
उपसरपंच — मा.श्री. सुधीर पाटील



ग्रा.पं.सदस्य — मा.श्री. हमीद पठाण
ग्रा.पं.सदस्य — मा.श्री. सचिन राऊत
ग्रा.पं.सदस्य — मा.श्री. सतीश माळी
ग्रा.पं.सदस्य — मा.सौ. मंगलताई गवळी
ग्रा.पं.सदस्य — मा.सौ.शीतल गायकवाड

ग्रा.पं.सदस्य — मा.सौ.अनिता पाटील
ग्रा.पं. सदस्या — मा.सौ. सुरेखा सं.माळी
ग्रा.पं. सदस्या — मा.सौ. संजना र.गुरव
लिपीक — मा.श्री.श्रीकांत गायकवाड

मा.शशिकांत गायकवाड — संगणक परिचालक | मा.दस्तगीर पटेल — शिपाई | मा.शिवाजी माळी — शिपाई | मा.रहिमान जमादार — घंटागाडी चालक | मा.अभिमन्यू रणसुरे — सफाई कामगार

ग्रामपंचायत कार्यालय व ग्रामस्थ, तामलवाडी



श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या भाविकांचे हार्दिक स्वागत..!

शेतकऱ्यांच्या उज्वल भविष्यासाठी एकमेव पसंती




सर्वोत्कृष्ट दर्जाचे प्रतीक...

महानंदी

ठिबक व पाईप कंपनी

महानंदी

:Siddu Saheb-9822229197



चि.संतोष सचिन शिंदे

आपणास वाढदिवसाच्या मनपूर्वक शुभेच्छा!

* शुभेच्छुक *

शिंदे, घोटकर, भोसले, केसरे, पवार, घाटोळे, केत, राजमुद्रा प्रतिष्ठाण, प्रहार दिव्यांग संघटना, शिवरत्न न्युज व शिवरत्न प्रतिष्ठाण, श्री. सचिन अशोक शिंदे व मित्र परिवार.







श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या तमाम भाविकांना मनस्वी शुभेच्छा



* शुभेच्छुक *

## साईराम कृषी सेवा केंद्र

साईराम टेड्रर्स, तामलवाडी, ता.तुळजापूर







श्री हरिहर नगरीतील यात्रा सोहळ्यास येणाऱ्या भाविकांचे हार्दिक स्वागत

शिवभक्त समर्थ (भैय्या) घोटकर

* सौजन्य *

हॉटेल समर्थ तामलवाडी




# श्री विष्णू महादेव यात्रा विशेष

तामलवाडी, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

* पुरवणी संयोजक *
अविनाश गणपतराव गायकवाड

सोलापूर तरुण भारत

सोलापूर । मंगळवार, दि.३१ मार्च २०२६


# युवा पिढीने अध्यात्माकडे वळण्याची अत्यंत गरज !



**वारकरी विशेष**

**अविनाश गायकवाड**

दोन वर्षांपूर्वी तामलवाडी येथे सुवर्णमहोत्सवी सप्ताह उत्साहात साजरा झाला. त्यावेळी महाप्रसाद म्हणून रोजच गावभोजन असायचे. या सप्ताह सोहळ्यात रोजच शेकडो युवक सहभाग नोंदवायचे; भाविकांना भोजन वाढाचये...त्यांची सेवा करायचे मात्र भजन, कीर्तनास यातील युवकांची उपस्थिती नगण्यच असायची...यंदाही असाच प्रत्यय आला. भविष्यात भजन-कीर्तन, प्रवचन, पारायण सोहळे कसे पार पडायचे? असा प्रश्न तामलवाडीच्याच नाहीतर गावोगावच्या जेष्ठ वारकऱ्यांना पडला आहे; यामुळे आता नवीन युवा पिढीने अध्यात्म क्षेत्राकडे वळण्याची तितकीच गरज निर्माण झाली आहे...इतकेच नाहीतर प्रत्येक घरात किमान एकेक वारकरी तयार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

यंदा तामलवाडीचा ५२ वा सप्ताह सोहळाही उत्साहात पार पडला. आता सर्वांना वेध लागले ते यात्रा-सोहळ्याचे. यात्रेच्या पहिल्या दिवशी कावड मिरवणूक, रक्तदान उपक्रम आणि इतर धार्मिक कार्यक्रम उत्साहात पार पडले आणि आजचा दुसऱ्या दिवशीचा शेरण्याचा कार्यक्रमही दिमाखदारच होणार आहे. दरम्यान, या गावाच्या जडणघडणीत संत तुकाराम महाराजांचे वंशज असलेल्या पंढरीतील देहूकर कुटुंबाचे मोठे योगदान आहे. महाराष्ट्रात निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम यांनी बहुमोल संत साहित्य निर्माण करून जनसामान्यांपर्यंत अध्यात्माचे विचार नेले आणि सामान्य जनतेला अध्यात्माची गोडी लावण्याचे एक महान ऐतिहासिक कार्य केले. तामलवाडीपासून मराठवाड्यात निजामशाहीच होती. यामुळे तामलवाडीतील भजन-कीर्तनाची सोय त्यावेळी स्व. शामरावअण्णा गायकवाड यांच्याच वाड्यात होती. स्वातंत्र्यानंतर तामलवाडी पंचक्रोषीचे गुरूवर्य स्व. श्रीगुरू सोपानकाका महाराज देहूकर यांनी या गावच्या लोकांना अध्यात्माची ओढ लावली. यानंतर भजन-कीर्तन श्री विष्णू-महादेव मंदिरात होवू लागले. स्व. सोपानकाकांनी भजन, कीर्तनाचे धडे या गावकऱ्यांना दिले. त्यावेळी १०-२० वारकरी होते. यामध्ये तत्कालीन सरपंच स्व. सदाशिवराव पाटील, स्व. तुकाराम पाटील, स्व. गणपतराव गायकवाड, स्व. चंद्रहार पाटील, स्व. सोपान राऊत, स्व. सुर्यभान राऊत, स्व. शिवराम लोंढे, स्व. विठ्ठल गायकवाड, स्व. गोविंद माळी, स्व. हरिदास माळी, स्व. रामचंद्र कुलकर्णी, स्व. दगडू घोटकर, स्व. हरिदास माळी, स्व. धोंडिबा गायकवाड, स्व. जनार्धन गवळी, स्व. बंडोबा लोंढे आदी अनेक मंडळी होती.

श्रीगुरू सोपानकाकांचे वैकुंठगमन झाल्यानंतर त्यांची फड परंपरा श्रीगुरू वै. माऊली महाराज देहूकर, श्रीगुरू बापूसाहेब महाराज देहूकर, श्रीगुरू बाळासाहेब महाराज देहूकर यांच्याकडे आली. या तिघांनी या भागात वारकरी सांप्रदायाची चांगलीच मुहुर्तमेढ रोवली. श्रीगुरू देहूकर सांप्रदायिक मंडळाची स्थापना केली. यामध्ये स्व. गणपतराव पाटील, स्व. सुरेश घोटकर, स्व. हरिभाऊ राऊत, स्व. अरूण गायकवाड, स्व. विश्वनाथ नेटके, स्व. गजेंद्र लोंढे, गंगाधर घोटकर, माजी सरपंच दत्तात्रय वडणे, भास्कर पाटील, अर्जुन लोंढे, भाऊसाहेब पाटील, प्रभाकर गायकवाड, नागनाथ पाटील, बाळासाहेब सोपान गायकवाड, शिवाजी पाटील, बलभिम गायकवाड, रामहरी माळी यांनी सहभाग घेतला. सध्या देहूकरांची ३ री पिढी श्रीगुरू कान्होबा महाराज देहूकर आता चालवित असून, ते तर तामलवाडी पंचक्रोषीसह अवघ्या मराठवाड्यात वारकरी सांप्रदाय वाढविण्यात मोलाची भर टाकत आहेत. त्यांच्या कीर्तन सोहळ्यात दुसऱ्या पिढीतील टाळकरी आणि आता तिसऱ्या पिढीतील या गावचे केशव गुरव, विनायक पाटील, संतोष जगताप, नामदेव पाटील, रामदास गायकवाड, सुनील राऊत, धनाजी घोटकर आदींसह शेकडो टाळकरी आणि हजारो श्रोते मंडळी रमून जातात. आजवर या गावात संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशताब्दी समाधी संजीवन सोहळा आणि संत तुकाराम महाराज त्रिशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वैकुंठगमन सोहळाही वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम, दररोज हरिकीर्तन, हरिपाठ, भजन आदींनी पार पडला. याच कालावधीत श्री विष्णू महादेव मंदिर शिखर जीर्णोद्वार होवून कळसारोहन समारंभ पार पडला आणि सध्या श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर शिखर जीर्णोद्वार झाला असून, याचेही कळसारोहण झाले. यासाठी यात्रा कमिटीचे पदाधिकारी, सदस्यांनी मोठे योगदान दिले. देहूकरांच्या या तीन पिढ्यांचे तामलवाडी पंचक्रोषीसाठी फार मोठे योगदान आहे. सध्याही अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही महाराष्ट्राची संस्कृती आणि अस्मिता या थोर साधुसंतांमुळेच शाबूत राहिली. म्हणून या लाडक्या संतांचे समग्र वाड.मय म्हणजे महाराष्ट्राच्या समाजजीवनाचा एक अमूल्य असा सांस्कृतिक ठेवा आहे. या संतांच्या मालिकेत श्री संत तुकाराम महाराजांचे स्थान अनन्यसाधारण आहे. त्यांनी सोप्या नामभक्तीचा महिमा पटवून आपल्या अभंगांद्वारे सुविचार व सदाचाराचा प्रसार केला व समाजात भक्तिमार्गाच्या द्वारा नवचैतन्य निर्माण केले आणि आपल्याबरोबरच साऱ्या समाजाला सन्मार्गाला लावले. त्यांच्या या बहुमोल वाड.मयाचा ठेवा म्हणजेच श्री तुकाराम महाराजांच्या अभंगांची गाथा पुनर्मुद्रित करून महाराष्ट्र शासनातर्फे काही वर्षांपूर्वी प्रकाशित झाली आहे. त्यांनी हे थोर संतसाहित्य निर्माण केल्याने खालील संतोक्तीचा आठव होतोच.... जगाच्या कल्याणा संतांच्या विभुती। देह कष्टविती परोपकारे।।

या गावाला इतकं मोठं अध्यात्माचं वैभव लाभलेलं असताना भावी पिढी मात्र या अध्यात्माकडे वळायला तयार नाही; याची खंत सर्वांनाच वाटत आहे. गावाची लोकसंख्या १० हजाराच्या घरात जावूनही भजन, कीर्तन, प्रवचनासाठी ठरावीक लोकच असतात; हीही खंत अनेक कीर्तनकार महाराजांनी बोलून दाखविली. आपल्या गावात माळकरी वर्गही मोठा आहे; यामुळे भविष्यात घराघरातून किमान एकेक वारकरी तयार व्हावा आणि आपल्या गावाचा अलौकिक आणि समृध्द अध्यात्म वारसा भावी पिढीने पुढे चालविणे सर्वांनाच गरजेचे वाटत आहे.

# तामलवाडीच्या अध्यात्माची ऊर्जा; श्रीमंत गुरुवर्य देहूकर घराणे





**श्रीगुरू विशेष**

**महादेव मसुते (शिक्षक)**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक जीवनात वारकरी संप्रदायाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. भक्ती, नामस्मरण, कीर्तन आणि वारी या चार आधारस्तंभांवर उभा असलेला हा संप्रदाय समाजाला अध्यात्म, समानता आणि प्रेमाचा संदेश देतो. अखंड हरिनाम सप्ताह, गुरुपरंपरा आणि पंढरपूरची फडपरंपरा ही या वारकरी परंपरेची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. वारकरी संप्रदायात 'नाम' हेच साधन आणि साध्य मानले जाते. भक्तांचे नामस्मरण म्हणजे आत्मशुद्धीचा सर्वात सोपा मार्ग आहे. म्हणूनच

**नामसंकीर्तन साधन पै सोपे**
***जळतील पापे जन्मांतराची***

या उक्तीप्रमाणे नामजप व्हावा या उदात्त हेतूने ५२ वर्षांपूर्वी श्रीमंत गुरुवर्य कै. सोपानकाका महाराज देहूकर यांच्या प्रेरणेने, मार्गदर्शनाने व त्यांच्या दिव्य सान्निध्याने तामलवाडी या गावात अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात झाली. पुढे हाच अध्यात्माचा वसा आणि वारसा गेली ५२ वर्षे त्यांच्याच गुरुपरंपरेतील गुरुवर्य कै. ज्ञानेश्वर माउली महाराज देहूकर (दादासाहेब), श्रीगुरु गुरुवर्य श्री. बापूसाहेब महाराज देहूकर (आण्णासाहेब), श्रीगुरु गुरुवर्य श्री. कान्होबा महाराज देहूकर (नानासाहेब), श्रीगुरु गुरुवर्य चि. निळकंठ महाराज देहूकर यांनी पुढे चालू ठेवलेला आहे.

अखंड हरिनाम सप्ताहात सात दिवस गावात काकड आरती, गाथा-पारायण, भजन, हरिपाठ, प्रवचन, कीर्तन, हरिजागर, पालखी, दिंडी असे भरगच्च कार्यक्रम होतात. संपूर्ण गाव एकत्र येऊन भक्तीचा उत्सव साजरा करतो. हा सप्ताह म्हणजे अन्नदानाचा महायज्ञच असतो आणि हा उत्सव गावातील सामाजिक ऐक्याचा एक वस्तुपाठच असतो. तामलवाडीचे अध्यात्माचा नंदादीप अखंडपणे प्रज्वलित ठेवण्याचे महत्कार्य श्रीगुरु देहूकर महाराज यांच्या गुरुघराण्याने आजपर्यंत कायम ठेवलेले आहे.

**गुरुवाचोनी कोण दाखवील वाट**
**आंधळ्याची काठी जशी**

याप्रमाणे वारकरी संप्रदायातील जगद्गुरु श्रीमंत तुकाराम महाराज यांच्या घराण्यातील गुरुपरंपरा अत्यंत समृद्ध आहे. या परंपरेतील श्रीमंत गुरुवर्य कै. सोपान काका महाराज यांच्या प्रेरणेने सुरु झालेली... ही अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा श्रीगुरु गुरुवर्य कै. ज्ञानेश्वर माऊली (दादासाहेब) देहूकर आणि श्रीगुरु गुरुवर्य बापूसाहेब महाराज (आण्णासाहेब) देहूकर या अध्यात्मातील राम-लक्ष्मणासारख्या बंधुतुल्य गुरुबंधूंनी विस्तारून समृद्ध केली. यामध्ये वेळोवेळी गुरुवर्य बापूसाहेब महाराज देहूकर, गुरुवर्य विठ्ठल महाराज देहूकर, गुरुवर्य महेश महाराज देहूकर यांनी त्यांच्या दिव्य उपस्थितीने, मार्गदर्शनाने आणि सेवेने ही परंपरा पुढे नेत असताना गेली अनेक वर्षे श्रीगुरु गुरुवर्य बापूसाहेब महाराज देहूकर यांच्या दिव्य सान्निध्यात आणि गुरुवर्य कान्होबा महाराज देहूकर यांच्या मार्गदर्शनात हा संपन्न वारसा विस्तारत आणि वाढत आहे. दोन वर्षापूर्वी संपन्न झालेला सुवर्णमहोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाचे भव्यदिव्य आयोजन असेल, गावचे ग्रामदैवत श्री विष्णू-महादेव मंदिर शिखर बांधकाम व कलशारोहण असेल आणि यावर्षी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराचे झालेले शिखर बांधकाम व कलशारोहणाचा समृद्ध, संपन्न झालेला कार्यक्रम असेल श्रीगुरु गुरुवर्य बापूसाहेब महाराजांचा आशीर्वाद व श्रीगुरु गुरुवर्य कान्होबा महाराजांचे मार्गदर्शन यामुळे तामलवाडीचे आध्यात्मिक वैभव द्विगुणित झाले.

**माझा गुरुचरणी ठेविला माथा**
**तुटली जन्माची व्यथा आणि अशी भावना झाली**
**की,गुरुविण ज्ञान नाही, ज्ञानाविण मुक्ती नाही**

गुरुपरंपरेतील उदयोन्मुख प्रतिभेला व्यासपीठ देणारी, अढळ श्रद्धा, भक्ती गुरुचरणी प्रदान करणारी ही वारकरी परंपरा पूर्ण पंचक्रोशीला दिशादर्शक ठरणारी आहे.

या गुरुपरंपरेतील श्रीगुरुवर्यांच्या समृद्ध कीर्तनसेवेतील उत्कृष्ट सादरीकरण, प्रतिभावंत मांडणी, क्रियास्वानंद आशय, प्रभावी गायन, उत्तम निवेदनशैली, प्रतिभेचा आत्मविश्वास, विचारांची धार आणि ठामपणा यामुळे तामलवाडीचे आध्यात्मिक मन संतुष्ट आणि संपन्न झाले आहे. गुरुपरंपरेचा हा अखंड वारसा गुरुभक्ताला ईश्वराकडे नेणारा दुवा आहे. गुरूच्या चरणी नम्रतेने मस्तक ठेवले की जीवनातील दुःख संपते.

# नामस्मरणानेच ईश्वर दर्शन..!



**अध्यात्म विशेष**

**हभप विनायक पाटील**

प्राचीन काळातील ऋषीमुनी, साधुसंतांपासून आलेली अध्यात्म विद्याही तुमच्या आमच्यापर्यंत चालत आली व त्यांनी अनुभवलेले ईश्वर दर्शन म्हणजेच आत्मज्ञान हे त्यांच्या ग्रंथाद्वारे म्हणजेच शब्दज्ञानाद्वारे तुम्हा आम्हाला कळून आले; हे त्यांची बहु थोर उपकार आहेत. म्हणूनच श्री तुकोबाराय म्हणतात काय सांगो आता संतांचे उपकार। मज निरंतर जागविती।। काय द्यावे त्यासी व्हावे उतराई। ठेविता हा पायी जीव थोडा।। सहज बोलणे हित उपदेश। करुनी सायास शिकविति।। तुका म्हणे वत्स धेनुवेचे चित्ती, तैसे मज येती सांभाळीत।। असे तुकोबारायांनी त्या साधुसंताविषयी व तत्पूर्वीच्या ऋषीमुनी विषयी ऋण बोलून दाखविले आहे. थोडक्यात सांगायचे म्हणजे नामस्मरणाद्वारेच ईश्वर दर्शन सर्वांना सुलभतेने मिळते.

आत्मज्ञानी जे साधू संत असतात, त्यांनी खडतर नामसाधना करून ईश्वर प्राप्ती करून घेतलेली असते. आत्मज्ञान म्हणजे आत्म्याचे दर्शन होय. यात सगुण दर्शन व निर्गुण दर्शन असे दोन प्रकार संभवतात, सगुण दर्शनात मूर्ती उपास्य दैवत सद्गुरु यांचे दर्शन होते, कधीकधी स्वप्नदृष्टांत व मानस पूजेत दर्शन घडते. तर निर्गुण दर्शनात रंग, रूप, आकार, तेज, नाद, रस या स्वरूपात दर्शन घडते असा साक्षात्कारी संतांचा अनुभव असून तोही त्यांनी सगुण दर्शनाप्रमाणे निर्गुण दर्शनाच्या संदर्भात अभंग ओवी याद्वारे प्रतिपादला आहे. हे अनुभव जर शब्द ज्ञानाच्या माध्यमातून सांगितले गेले नसते तर आत्मज्ञान लुप्त झाले असते म्हणून संतांचे जगावर उपकार आहेत याद्वारे आपल्याला या संतांची थोरवी कळून येते. शब्द ज्ञानाच्या पातळीवर प्रकटलेले संत साहित्य म्हणजे ईश्वराची आत्म स्वरूपाची खूणच आहे. नामस्मरण हीच मुख्य भक्ती...... प्रपंच करताना भक्तिमार्गावर वाटचाल करून ईश्वर प्राप्तीचे ध्येय ठेवून परमार्थ करायचा की भक्ती विचाराची भूमिका शब्द ज्ञानाने समजावून घेऊन ईश्वर प्राप्तीची इच्छा व्यक्त करून घडेल तसे साधन करीत राहायचे; हा प्रश्न जेव्हा माणसाच्या मनात निर्माण होतो तेव्हा त्याचे उत्तर ऐकायला मिळते, घडेल तसे साधन जमेल तेवढा परमार्थ एवढीच इच्छा आहे. पण गीता ज्ञानेश्वरी, भागवत अभंग गाथा अशा भक्ती ज्ञान पर ग्रंथातून संतांनी एकमुखाने असे सांगितले आहे की, प्रयत्नपूर्वक साधना करीत करीत ईश्वर प्राप्तीचे ध्येय आपण निश्चित केले आहे.

काय मनात आंतरिक तळमळ आहे काय...कारण तळमळी शिवाय परमार्थ नाही, त्यातूनच गुरु, नाम, संप्रदाय, साधना याविषयी ओढ प्रेम निर्माण होऊन साधक भक्तिमार्ग अनुसरू लागतो. संत वचनावर विश्वास ठेवून प्रपंच आदराने करावा पण त्यात गुंतू नये असा उपदेश सर्वच साधुसंतांनी केला आहे. पुढे गुरुकृपेने नाममंत्र प्राप्ती होऊन श्वासोच्छवासी नामस्मरण करावे, अशी साधना सांगितली आहे. तात्पर्य हेच आहे की, भक्तीची ईश्वर दर्शनाची तळमळ असेल तर परमार्थाची वाटचाल अखंडपणे करता येते. ज्या वस्तूचा ध्यास आपल्याला लागतो तीच प्रयत्नाने मिळिवता येते.

प्रपंचातही केले जाते, परमार्थात ही हीच गोष्ट अग्रभागी ठेवावी लागते. गुरुकृपांकित नामाचे अखंड स्मरण करून याची देही याची डोळा देव पाहता यावा, असे सर्व साधू संतांचे सांगणे आहे. तामलवाडी हे गाव आध्यात्मिक परंपरेने समृद्ध गाव आहे. श्रीगुरु देहुकर फड परंपरेतील अग्रस्थानी असलेले गाव. गावचे ग्रामदैवत श्री विष्णू महादेव यात्रा चैत्र शुद्ध एकादशी ते चैत्र शुद्ध पौर्णिमेपर्यंत असते. यात कावड मिरवणूक, शेरण्या, नगर दिंडी प्रदक्षिणा असे स्वरूप असते. गावातील सर्व जाती धर्मांचे भाविक यात्रेमध्ये मोठ्या संख्येने उपस्थित राहून भगवान शंकराची पूजाअर्चा, अभिषेक, दंडवत प्रदक्षिणा, भजन, कीर्तन व बोललेले नवस पूर्ण करतात. यावर्षी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर कळसारोहण सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. तामलवाडीच्या इतिहासात भव्य दिव्य प्रमाणात नोंद होईल, असाच हा नयनरम्य सोहळा होता. श्री समाधान महाराज चैतन्य यांच्या शुभहस्ते कळसारोहण झाले. भगवान शंकर लवकर प्रसन्न होणारे दैवत म्हणून तर देव, दानव, मनुष्य, यक्ष, गण, किन्नर, गंधर्व, किंपुरुष, भूत, प्रेत, पिशाच, पितर असे सर्वजण मोठ्या भक्ती भावांनी त्याची भक्ती करतात. संतनामदेवराय म्हणतात कैलासीचा देव भोळा चक्रवर्ती। पार्वतीचा पती योगीराज।। तयाचिया पाया माझे दंडवत। घडो आणि चित्त जडो नामी।। हा देव कैलासात राहतो; ते कैलास कसे आहे, त्या कैलासाचे वर्णन श्रीमद् भागवतात आलेले आहे. जेव्हा दक्ष यज्ञामध्ये भगवान शंकराचा अपमान केला तेव्हा रुद्र सेवकांनी यज्ञ विध्वंस केला; तेव्हा भगवान शंकरांना शांत करण्यासाठी ब्रह्मदेव सर्व देवांना घेऊन शंकराचे प्रिय निवासस्थान असलेल्या पर्वत श्रेष्ठ कैलासावर गेले. तेव्हा कैलासाचे वर्णन केलेले आहे. तेथील कल्पवृक्ष आपल्या उंच उंच फांद्यारूप हातांनी जणु पक्षांना बोलावीत आहेत तसेच हत्तींच्या चालण्या फिरण्याने तो कैलास पर्वत स्वतःच चालल्यासारखा आणि झऱ्यांच्या खळखळाटाने बोलत असल्यासारखा वाटत आहे. तिथे मंदार, पारिजात, देव दारू, तमाल, ताड, कांचन आणि अर्जुन वृक्षामुळे तो पर्वत रमणीय दिसत आहे. आंबा, कदम, नागचाफा, पुन्नाग, चाफा, पाटल, अशोक, बकुळ, कुंद, कोरांटी, सोनेरी कमळे, वेलदोडे दालचिनी जाई मालतीच्या सुंदर वेली शेवंती मोगरा कस्तुर मोगरा यांनी तो शोभत होता.

तेथील सरोवरात चंद्र विकासाची, निळी, पांढरी इत्यादी अनेक जातीची कमळे उमललेली होती तसेच ती गोड किलबिल करणाऱ्या पक्षांच्या थव्याने सुंदर दिसत होती. तेथे जिकडेतिकडे हरीण, वानर, सिंह, अस्वले, साळी, नीलगाय, कस्तुरी मृग राहत होते. तेथील सरोवरांचे तट केळींनी वेढलेले असल्यामुळे सुशोभित दिसत होते. भगवान शंकराचे निवासस्थान असा तो कैलास पर्वत पाहून देवांना खूप आश्चर्य वाटले. पुढे विशालकाय वटवृक्ष दिसला. त्या वृक्षा खाली भगवान शंकर बसलेले देवांनी पाहिले. ते क्रोधरहित कालाप्रमाणे दिसत होते. त्यांचे शरीर अतिशय शांत होते, यक्षराज कुबेर त्यांची सेवा करत होता. असे खूप मोठे वर्णन श्रीमद्भागवतामध्ये आलेले आहे. सर्व साधुसंतांनी भगवान शंकराचे वर्णन आपल्या अभंगाद्वारे केलेले आहे. भजन करी महादेव। राम पूजी सदाशिव ।।असे संत जनाबाईनी म्हटलेले आहे.

शिव भोळा चक्रवर्ती। त्याचे पाय माझे चित्ती।। असे नाथरायांनी म्हटले आहे. तुम्ही विश्वनाथ। दीन रंक मी अनाथ।। असे तुकोबारायांनी म्हटले आहे. भस्म उटी रुंडमाळा। हाती त्रिशूल नेत्री ज्वाळा।। गज चर्म व्याघ्रांबर। कंठी शोभे वासुकी हार।। असे नरहरी सोनार यांनी म्हटले आहे. असे असणारे भगवान शंकर यांचे नामस्मरण करून कृपा प्राप्त करून घ्यावी हीचं सदिच्छा. नवीन तरुण पिढीने श्रीगुरू देहुकरसंप्रदाय फड परंपरेमध्ये मोठ्या संख्येने सामील होऊन गावची शोभा वाढवावी हीच अपेक्षा शेवटी मी व्यक्त करतो.


